**प्रेसनोट दि.१४/०६/२०१९**

**भारती विद्यापीठ पोलीस ठाणे, पुणे शहर**

**वाहनचोरीच्या गुन्हयातील आरोपीस रंगेहात ताब्यात घेवुन कोंढवा पो स्टे गु र नं ५२१/२०१९ भा द वि क ३७९ हा गुन्हा उघडकीस आणुन चांगली कामगीरी केलेबाबत..**

आज दि. १३/०६/२०१९ रोजी कात्रज चौकीचे चौकी अंमलदार पो हवा ३६५९ मोढवे, मदतनीस पो शि ८७५१ खाडे, कात्रज बीट मार्शलचे कर्मचारी पो शि ७६६२ सुळ, पो शि ७२८२ धायगुडे असे दिवसपाळी कर्तव्य बजावित असतान दु १३.०० वा चे सुमारास पो शि ७६६२ सुळ व पो शि ८७५१ खाडे यांना त्यांचे बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, सच्चाई माता मंदिर येथे एक इसम रिक्षा घेवुन उभा असुन तो रिक्षा चा नंबर बदलत आहे अशी बातमी मिळाल्याने त्यांनी सदर बातमीचा आशय आम्हास कळविल्याने आम्ही त्यांस सदर इसमास ताब्यात घेवुन कारवाई करणेबाबत आदेशीत केले असता कात्रज बीट मार्शलचे कर्मचारी असे सच्चाईमाता येथे गेले असता एक इसम रिक्षाचा नंबर ऑईलपेन्टने रंगवत असताना दिसल्याने त्यास जागीच पकडुन त्यास त्याचे नाव व पत्ता विचारता त्याने आपले नाव अर्जुन भिष्माचार्य म्हस्के वय २५ वर्षे रा सरगम चाळ, सुप्पर, अप्पर, बिबवेवाडी पुणे असे सांगितले. त्यास त्याचे ताब्यात असलेल्या रिक्षा नंबर एमएच/१२/एचसी/११६४ बाबत चौकशी केली असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिल्याने त्यास कात्रज पो चौकी येथे घेवुन आलो. त्याचे ताब्यात असलेले रिक्षा नंबर एमएच/१२/एचसी/११६४ हिचे मालकाचा शोध घेतला असता मालकाचे नाव संजय काशीनाथ तलकारी रा ससाणेनगर, गणेश विहार सोसा, हडपसर, पुणे असा असल्याचे समजले. त्यांचे राहते पत्यावर जावुन समक्ष त्यांना भेटुन चौकशी केली असता त्यांचा मुलगा समीर संजय तलकारी रा तळमजला सद्‌गुरुकृपा बिल्डींगनं ४, काकडे वस्ती, व्हि.आय.टी. हॉस्टेल जवळ, कोढंवा बुा पुणे मोनं ९९२२७४६८६९ हा सदरची रिक्षा चालवित असुन तो त्याचे पत्नी सोबत काकडे वस्ती येथे राहत आहे. म्हणुन समीर याचे मोबाईलवर संपर्क साधला असता त्याने सांगितले की, दि ११/०६/२०१९ रोजी ११.४५ वा ते १२/०६/१९ रोजी ००.४५ वा चे दरम्यान राहते घरासमोर रिक्षा पार्क केली असता ती कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली म्हणुन मी कोंढवा पो ठाणे येथे गु.र.क्र ५२१/१९ भादवि कलम ३७९ प्रमाणे तक्रार दिली आहे. म्हणुन समीर संजय तलकारी यांना कात्रज चौकी येथे बोलावुन सदरची रिक्षा त्यांना दाखविली असता ती त्यांनी ओळखुन व पाहुन आपली चोरीस गेलेली रिक्षानं एमएच/१२/एचसी/११६४ हिच असल्याचे सांगितले. सदरबाबत कोंढवा पो ठाणे येथे गु.र.क्र ५२१/१९ भादवि कलम ३७९ प्रमाणे गुन्हा नोंद असल्याने इसम नामे अर्जुन भिष्माचार्य म्हस्के वय २५ वर्षे रा सरगम चाळ, सुप्पर, अप्पर, बिबवेवाडी पुणे व चोरीस गेलेली रिक्षा एमएच/१२/एचसी/११६४ हि व फिर्यादी समीर संजय तलकारी रा तळमजला सद्‌गुरुकृपा बिल्डींग नं ४, काकडे वस्ती, व्हि.आय.टी. हॉस्टेल जवळ, कोढंवा बुा पुणे यांना पुढील कारवाई करीता कोंढवा पो ठाणे येथे हजर करीत आहोत.

(विष्णु शं. पवार)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
भारती विद्यापीठ पोलीस ठाणे, पुणे शहर